Vidya Prasarak Mandal, Thane’s
**Maharshi Parshuram College Of Engineering**
Hedvi-Guhagar road, At: **Velneshwar**, Taluka: Guhagar, Dist: Ratnagiri (Maharashtra) 415 729
***(AICTE & DTE approved and affiliated to University of Mumbai)***

Tel No. 02359-205237 / 38
E-mail: mpcoe@vpmmpcoe.org / info@vpmmpcoe.org
URL:www.vpmmpcoe.org

**"महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय आणि टाटा पॉवर मुंबई (TPSDI) यांच्यात सामंजस्य करार"**

वेळणेश्वर,

येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय आणि TPSDI (टाटा पॉवर कौशल्य विकास संस्था),मुंबई यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या करारांतर्गत परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि मेंटेनन्स संदर्भातील कौशल्य विकासाचे अनेक कोर्सेस TPSDI कडून खुले करण्यात आले आहेत. हे कोर्सेस केल्यामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन काळापासूनच भविष्यातील एक अभियंता म्हणून वेगवेगळ्या इंडस्ट्रीज मध्ये कोणत्या प्रकारची कौशल्ये आत्मसात करायची आहेत याची ओळख होणार आहे. अशा प्रकारचा करार करून विद्यार्थ्यांसाठी उपक्रम राबवणारे हे कोकणातील पहिलेच महाविद्यालय ठरले आहे.

TPSDI ही टाटा पॉवरचीच एक संलग्न संस्था असून ती अभियांत्रिकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना इंडस्ट्रियल ट्रेनिंगच्या माध्यमातून कौशल्य विकासाचे धडे देते. हे कोर्सेस अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना दोन सत्रांदरम्यानच्या सुट्टीच्या काळात आयोजित करण्यात येतात. प्रामुख्याने यात खालील कोर्सेसचा समावेश असतो.

१) सुरक्षितता, आरोग्य आणि पर्यावरण
२) सौर ऊर्जा आणि सौर पॅनल तंत्रज्ञान
३) विविध यांत्रिकी उपकरणांमधील व्हायब्रेशन आणि बॅलन्सिंग
४) व्हॉल्व ऑपरेशन्स, मेंटेनन्स
५) मोटर आणि पंप बेअरिंग्जची निवड, दुरुस्ती
६) मेंटेनन्स स्किल (मेकॅनिकल)
७) मेंटेनन्स स्किल (इलेक्ट्रिकल)
८) विद्युत निर्मिती प्रकल्पाशी ओळख (इलेक्ट्रिकल आणि मेकॅनिकल)
९) रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) ची निवड, कार्य आणि दुरुस्ती

या सर्व कोर्सेससाठी TPSDI कडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकहोत असते व त्या योगे अभियांत्रिकी महाविद्यालयातील मुलांना कमीत कमी खर्चात अधिकाधिक तंत्रज्ञान आणि विविध कौशल्य विकासात्मक योजना शिकता येत असल्याने त्यांच्या पुस्तकी ज्ञानासोबतच प्रात्यक्षिक ज्ञानातही मोलाची भर पडत असल्याने महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक संख्येने सहभाग घेऊन आपल्यातील कौशल्य विकासाला चालना द्यावी असे आवाहन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोळकर यांच्याकडून करण्यात आले आहे.

प्रस्तुत कराराच्या यशस्वीततेकरिता विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोळकर आणि महाविद्यालयातील 'ट्रेनिंग आणि प्लेसमेंट'चे प्रमुख श्री. निखिल गोखले यांनी विशेष मेहनत घेतली.
प्रस्तुत करारादरम्यान श्री मेस्त्री - Chief TPSDI, श्री बलराज भट - Principal ,TPSDI Trombay आणि श्रीमुकुल सक्सेना – Head Content Developmentहे TPSDI ट्रॉम्बे कडून उपस्थित होते.

या संदर्भातील अधिक माहितीसाठी महाविद्यालयांच्या ट्रेनिंग आणि प्लेसमेंटचे प्रमुख प्राध्यापक श्री. निखिल गोखले ९१४५१७७५९९ यांच्याशी संपर्क साधावा.






Vidya Prasarak Mandal, Thane's
**Maharshi Parshuram College Of Engineering**
Hedvi-Guhagar road, At: **Velneshwar**, Taluka: Guhagar, Dist: Ratnagiri (Maharashtra) 415 729
***(AICTE & DTE approved and affiliated to University of Mumbai)***

Tel No. 02359-205237 / 38
E-mail: mpcoe@vpmmpcoe.org / info@vpmmpcoe.org
URL:www.vpmmpcoe.org

## VPM's Mahrashi Parshuram College of Engineering Signs MoU with Tata Power, Mumbai

VPM's Maharshi Parshuram college of Engineering, Velneshwar (MPCOE) signed Memorandum of Understanding with Tata Power Skill Development Institute (TPSDI) ,Mumbai to develop Mechanical , Electrical and Maintenance skills related to Power Sector. **MPCOE is 1st engineering college from Kokan region to offer these skills across Kokan region.**

The Tata Power Skill Development Institute (TPSDI) is an endeavour from the Tata Power Company to empower youth and others with employable skills, especially in the Power and allied sectors, and to address the skill gap challenge faced by the Indian Power Sector.

The employability centric courses range from 2 to 12 weeks in duration and follow the TPSDI Competency Framework, which is congruous with the National Skill Quality Framework (NSQF). The TPSDI Competency Framework allows participants to swiftly pick up readily deployable skills and continue upgrading their skills after convenient intervals over a period of time. Courses offered are suitable for Diploma, ITI and Graduate Engineer and few of the courses are listed below.

1. Safety, Health & Environment (SHE) Foundation.
2. Solar Power PV Technician
3. Vibration & Balancing of Rotating Equipment
4. Valves Operation, Maintenance & Trouble shooting
5. Bearings Selection, Operation & Maintenance.
6. Maintenance Skills 1 & 2 for Mechanical Engineers
7. Maintenance Skills 1 & 2 for Electrical Engineers
8. Power Plant Familiarization for Electrical and Mechanical
9. Installation, Commissioning and Maintenance of Transformers , Switchgear






TPSDI has invested heavily in developing required infrasturucture to skill students (Diploma/Enginnering Graduates / ITI Students) . Though Tata has invested heavily in Skill development, courses are offered at optimic cost. It is appeal from Dr.Vijay Bedekar – Chairman and Dr.Avinash Chincholkar – Principal to make use this excellent opportunity.Mr.Mestry – Chief TPSDI, Mr.Bhat – Principal - Trombay and Mr.Mukul Saxena - Head, Content Development were present during MoU with VPM's MPCOE. You can contact Mr.Nikhil Gokhale – TPO for more information and guidance. Mobile – 9145177599